# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय आडगाव, नाशिक-पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

**E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांक:- २१/०९/२०१७

### ग्रामीण पोलीसांच्या ‘‘एक गाव एक गणपती’’ योजने अंतर्गत जिल्हयातील गणेश मंडळांतर्फे विविध उपक्रमांचे आयोजन

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री.संजय दराडे सो** यांचे संकल्पनेतुन जिल्हयात ‘‘एक गाव एक गणपती’’ हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत ग्रामीण भागातील **एकुण १०२३** गावांनी सहभाग घेवुन मोठया प्रमाणात प्रतिसाद दिला आहे. गणेशोत्सवा दरम्यान सार्वजनिक शांततेला बाधा पोहचु नये यासाठी पोलीस प्रशासनातर्फे तंटा मुक्ती समितीचे सहाय्याने ‘एक गाव एक गणपती’ हा उपक्रम सर्वत्र राबविण्यात येत आहे. या संकल्पनेचा महत्व पटल्याने जिल्हयातील विविध गावांमध्ये गणेशोत्सव साजरा करण्यावर भर दिला जात आहे. या उत्सवाच्या माध्यमातुन सामाजिक सलोखा आणि जनजागृती होऊ लागल्याने एक गाव एक गणपती साजरा करणा-या गावांची संख्या वाढु लागली आहे.

जेव्हापासुन ही संकल्पना सुरू झाली तेव्हापासुन स्वतंत्र गणेश मंडळांची संख्या कमी झाली आहे त्याचबरोबर गटांमधील स्पर्धाही कमी झाली. आता ज्या गावांमध्ये एकच गणपती पुजला जातो, त्या गावात गणेशोत्सवाचे निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. गावक-यांना एकत्र आणणारा हा उत्सव असल्याने कोणत्याही प्रकारचा भेदभाव न मानता सामाजिक समतेचा हेतु साध्य होवु लागला असुन गावांमध्ये एकोपा निर्माण होण्यास मदत होत आहे. त्यातच पुर्वी मनोरंजनाच्या कार्यक्रमांवर जो खर्च केला जात असे, तो खर्च आता गावभोजनावर होव लागला असुन या उपक्रमाची लोकप्रियता वाढु लागली आहे.

दरम्यान नाशिक तालुका पोलीस ठाणे हद्दतील गिरणारे गावात शिवमुद्रा युवा प्रतिष्ठान व जाणता राजा मित्र मंडळ यांचेतर्फे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो**, तसेच नाशिक ग्रामीण उपविभागाचे **पोलीस उपअधीक्षक श्री. सचिन गोरे,** पोलीस निरीक्षक नाशिक तालुका **श्री. अनंत मोहिते** यांचेसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते, दरम्यान गिरणारे व वाडगाव परिसरात वृक्षारोपनाचा कार्यक्रमही पार पडला.  तसेच कळवण पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील मानुर येथील महाराजा युवा गणेश मंडळातर्फे मानुर आश्रमशाळेतील विद्यर्थ्यांना शालेय वस्तुंचे वाटप करण्यात आले, यावेळी कळवण उपविभागाचे **पोलीस उपअधीक्षक श्री. सदाशिव वाघमारे**, कळवणचे पोलीस निरीक्षक श्री. मांडवकर उपस्थित होते, तसेच अभोणा हिंगलवाडी गावात ‘‘ बेटी बचाव बेटी पढाव’’ बाबत जनजागृती कार्यकमाचे आयोजन करण्यात आले, अभोणा पोलीस ठाण्याचे **सहा.पोलीस निरीक्षक श्री. उमाकांत गायकवाड** यांनी सदर ठिकाणी भेट दिली.

देवळा शहरातील शिवराजे मित्र मंडळ व देवळा पोलीस ठाणे यांचे संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले, यावेळी देवळा पोलीस ठाण्याचे **पोलीस निरीक्षक श्री. गुलाबराव पाटील** उपस्थित होते, शिवराजे गणेश मित्र मंडळातर्फे ग्राम स्वच्छता अभियान या विषयावर जनजागृती केली जात असुन विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. त्रंबकेश्वर शहरातील गणेश मंडळांचे भेटी दरम्यान शेतकरी आत्महत्या या विषयावर प्रबोधन करण्यात आले, गणेश मंडळाचे पदाधिकारी व पोलीस ठाण्यातर्फे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शालेय वस्तुंचे वाटप करण्यात आले यावेळी **त्रंबकेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस** निरीक्षक **श्री. रविकांत सोनवणे** यांचेसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा़ो** यांचे संकल्पनेतुन चालुवर्षीचे गणेशोत्सवा दरम्यान राबविण्यात येणा-या **विघ्नहर्ता बक्षिस योजनेअंतर्गत** जिल्हयातील विविध गावांमधील एक गाव एक गणपती व तालुका स्तरीय सार्वजनिक गणेश मंडळांनी सादर केलेली गणेश आरास, उत्कृष्ट सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक एकता, राष्ट्रीय एकात्मतेवर आधारीत देखावे, बेटी बचाव, ग्राम स्वच्छता अभियान यावर आधारित देखावे / कार्यक्रम सादर करणा-या गणेश उत्सव मंडळांना **ग्रामीण पोलीस दलातर्फे बक्षिसे प्रदान** करण्यात येणार आहे.